रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# हिंद-दी-चादर समागमात श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी भाविकांची महासागरासारखी गर्दी

## मान्यवरांसह हजारो भाविकांची हजेरी







**नांदेड । प्रतिनिधी -** ''हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात आज राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, पोहरादेवीचे, महंत, सुनील महाराज,बाबुसिंग महाराज, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोड यांच्यासह हजारो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. सर्व जिल्ह्यातून व नांदेड शहरातून आलेल्या हजारो भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत.

भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश पोहोचत आहे.

**जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले दर्शन**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास आज (दि. २४) जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे दर्शन घेतले. पवित्र गुरु ग्रंथ साहिबजी समोर माथा टेकला आणि आशीर्वाद घेतले.

**पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान नतमस्तक**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास आज (दि. २४) पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी नांदेड येथे हजेरी लावली. त्यांनी ऐतिहासिक तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे अत्यंत श्रद्धाभावाने दर्शन घेतले.

मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दुपारी सचखंड गुरुद्वारा येथे पोहोचले. गुरुद्वारा परिसरात प्रवेश करताच त्यांनी बोले सो निहालच्या जयघोषात पवित्र गुरु ग्रंथ साहिबजी समोर माथा टेकला आणि आशीर्वाद घेतले. यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ (से.नि.भाप्रसे) यांची उपस्थिती होती.

**विरासत-ए-सीख प्रदर्शन ठरतंय भाविकांचे आकर्षण**

शहरातील मोदी मैदानाच्या भव्य ५२ एकर परिसरात सुरू असलेल्या हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त शीख समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे विरासत-ए-सीख हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हे प्रदर्शन भाविकांसाठी आकर्षण ठरत असून या कार्यक्रमाला उपस्थिती लावलेले भाविक आवर्जून प्रदर्शनाला भेट देत आहेत.

शीख धर्माच्या स्थापनेपासून ते गुरू गोविंद सिंग यांच्यापर्यंतच्या सर्व गुरूंचा इतिहास, त्यांनी दिलेले योगदान सचित्र स्वरूपात मांडण्यात आला आहे. विशेषतः हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबत शीख योद्ध्यांनी वापरलेली विविध शस्त्रास्त्रे या प्रदर्शन दालनात ठेवण्यात आली आहेत. शीख धर्माचे पहिले गुरु श्री गुरु नानक जी ते शेवटचे गुरु गोविंद सिंगजी यांचा इतिहास व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख धर्मासोबतच सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव समाजातील महापुरुषांचाही इतिहास या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आला आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहीदी समागमनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले भाविक आवर्जून विरासत-ए-सीख या प्रदर्शनाला भेट देत आहेत. त्यामुळे या **पान २ वर**

## सेवाभाव, समता आणि बंधुतेचा संदेश देणारी 'लंगर सेवा'; लाखो भाविकांनी घेतला सेवेचा लाभ

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य धार्मिक व ऐतिहासिक कार्यक्रमात लंगर सेवेच्या माध्यमातून सेवाभाव, समता व मानवतेचे अनोखे दर्शन घडत आहे. धर्म, जात, भाषा, प्रांत यांचा कोणताही भेद न करता हजारो भाविकांना एकत्र बसवून भोजन देणारी ही लंगर परंपरा या कार्यक्रमाची खरी आत्मा ठरते आहे. हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी विविध राज्यासह महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातून भाविक या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. या भाविकांना मुख्य मंडपालगत उभारण्यात आलेल्या ८ मंडपाच्या माध्यमातून लंगर सेवा दिली जात आहे. लंगर सेवा ही केवळ भोजन व्यवस्था नसून मानवी समानतेचा आणि नि:स्वार्थ सेवेचा संदेश देणारी गौरवशाली परंपरा आहे. 'सर्व मानव समान आहेत' या तत्त्वावर आधारित ही सेवा हिंद-दी-चादर कार्यक्रमात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असून, लाखो भाविक, साधुसंत, नागरिक, स्वयंसेवक आणि पाहुण्यांना भोजन देण्यात येत आहे.

**स्वयंसेवकांचा सेवायज्ञ**

या लंगर सेवेत शीख बांधवांसह विविध सामाजिक संस्था, युवक-युवती, महिला, स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. भाजी कापणे, पोळ्या तयार करणे, अन्न शिजवणे, स्वच्छता राखणे, पंगतीत सेवा करणे ही कामे प्रत्येक कामात 'सेवा हीच साधना' या भावनेतून स्वयंसेवक करीत आहेत. अनेक जण तर पहाटेपासून उशिरा रात्रीपर्यंत न थकता सेवा देत आहेत.

**समतेचे प्रत्यक्ष दर्शन**

लंगरमध्ये श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, वृद्ध-लहान असा कोणताही भेद नाही. सर्वजण एकाच पंगतीत, जमिनीवर बसून भोजन ग्रहण करतात. यामुळे सामाजिक समतेचे प्रत्यक्ष दर्शन भाविकांना घडत आहे.

**नेटके व्यवस्थापन**

जिल्हा प्रशासन, महानगरपालिका आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून लंगर सेवेचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता, शुद्ध पाणी, आरोग्य तपासणी याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

# जालन्यातील थरारक गोळीबार प्रकरणाचा छडा

## कदीम जालना पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई; दोन आरोपी पहाटे अटकेत



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नूतन वसाहत भागात जिल्हा रुग्णालय रोडवर शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास घडलेल्या थरारक गोळीबार प्रकरणाचा अवघ्या काही तासांत छडा लावण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी शनिवारी पहाटे दोन आरोपींना सिनेस्टाईल पाठलाग करून शिताफीने अटक करण्यात आली असून, या कारवाईमुळे शहरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

शुक्रवारी रात्री सुमारे ८.३० वाजता चरण रायमल (वय २७) हा तरुण जिल्हा रुग्णालय रोडने जात असताना, स्कूटीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गावठी पिस्तूलमधून त्याच्यावर अंधाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात चरण गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारासाठी नेत असतानाच वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण जालना शहरात एकच खळबळ उडाली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचे निरीक्षक जनार्धन शेवाळे यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. आरोपींचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके तत्काळ रवाना करण्यात आली.

शनिवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास आरोपी अंबड रोडवरील काजळा फाटा परिसरातून पळून जाण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कदीम जालना पोलिसांनी सापळा रचत सिनेस्टाईल पाठलाग करून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले आरोपी अजय विजय आमलेकर, अमन शैलेंद्र धिल्लोड **पान २ वर**

# काद्राबाद पोलीस चौकीत 'सेटलमेंट'चा प्रयत्न!

## दुर्घटनेतील न्याय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या काद्राबाद पोलीस चौकीत एका गंभीर गुन्ह्याचे 'सेटलमेंट' करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून, यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि राजकीय हस्तक्षेपावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वली मामू परिसरातील कुंडलिका नदीतील खड्ड्यात पडून आजी व नातवाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या प्रकरणी ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटना घडल्याचा ठपका ठेवत सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षक सानप यांच्याकडे होती.

**महिनाभर कारवाई का रखडली?**

घटना होऊन महिनाभर उलटूनही ठोस कारवाई न झाल्याने मृतांच्या कुटुंबीयांमध्ये असंतोष होता. याच काळात जालना महानगरपालिकेच्या निवडणुकांची धामधूम सुरू असल्याने, या गंभीर घटनेकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष झाले का? असा सवाल उपस्थित होत आहे.

**निवडणुका संपताच 'सेटलमेंट'ची हालचाल**

निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर अचानक या प्रकरणाची चौकशी सुरू झाली आणि त्याचवेळी एका नवनिर्वाचित नगरसेवकाच्या मध्यस्थीने सेटलमेंटचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काद्राबाद पोलीस चौकीत संबंधित नवनिर्वाचित नगरसेवकाची जवळपास अर्धा तासाहून अधिक काळ बैठक झाली यात सुमारे ७ लाख रुपयांची तडजोड (सेटलमेंट) करण्याचा प्रयत्न झाला मात्र, ही सेटलमेंट प्रत्यक्षात झाली की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

**पोलीस निरीक्षकांचे स्पष्टीकरण**

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''दाखल गुन्ह्यात जे होईल ते पूर्णपणे कायद्यानुसारच होईल. कोणत्याही प्रकारची सेटलमेंट होणार नाही. या प्रकरणात मी स्वतः लक्ष घालणार आहे.''

**मनपा प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात**

दुसरीकडे, जालना शहर महानगरपालिकेचे राजेश बगळे यांनी देखील या प्रकरणात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. युवा आदर्शशी बोलताना त्यांनी सांगितले की, ''ही दुर्घटना आहे. पोलीस किंवा मनपाची यात चूक नाही. मात्र, तक्रारदारास काही मावेजा मिळावा यासाठी प्रयत्न करू. आजच्या दिवशी (दि. २४) मात्र माझ्याकडे कोणी आलेले नाही.''

> पत्रकाराला कुणी सांगितले? या एका प्रश्नाने काद्राबाद पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी - कर्मचारी विचारात पडले आहेत. युवा आदर्शच्या प्रतिनिधीला ठाण्यातील एका पोलीस कर्मचाऱ्याने म्हटले की, मला माहिती आहे तुम्हाला ही माहिती कुणी दिली? तो हे पांगवत आहे. आता हे चक्क एक पोलीस कर्मचारी म्हणतो म्हणजे कुठतरी पाणी मुरतं असेच म्हणावे लागेल. त्यानंतर पोलीसांचे खबऱ्यांना फोनही झालेत.

**न्याय कुणासाठी?**

एका बाजूला आजी-नातवाचा मृत्यू, दुसऱ्या बाजूला पैशांच्या तडजोडीची चर्चा हे चित्र अत्यंत अस्वस्थ करणारे आहे. जर गुन्हा दाखल झाल्यानंतरही पोलीस चौकीत बसून सेटलमेंट होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कसा टिकेल? मृतांच्या कुटुंबीयांना न्याय कसा मिळणार? राजकीय दबावाखाली तपास दाबला जातो आहे का?

**थेट हस्तक्षेपाची मागणी**

या संपूर्ण प्रकरणात सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी स्वतः लक्ष घालावे, सेटलमेंटच्या आरोपांची सखोल चौकशी करावी, आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शहरातून पुढे येत आहे.

ही घटना केवळ एक अपघात नसून, प्रशासन राजकारण पोलीस यंत्रणा यांच्या संगनमताचा संशय निर्माण करणारी आहे. 'सेटलमेंट संस्कृती' जर पोलीस चौकीपर्यंत पोहोचत असेल, तर तो कायद्याच्या राज्यासाठी गंभीर धोका ठरू शकतो.

## संपादकीय पान

### मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन. आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रथसप्तमी

माघ शुद्ध सप्तमी म्हणजेच रथसप्तमी. हा सूर्यनारायणाची मनोभावे पूजा करण्याचा अन् त्याच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. प्रतिवर्षी मकरसंक्रांतीला चालू होणाऱ्या हळदी-कुंकू समारंभांची सांगता रथसप्तमीच्या दिवशी केली जाते. या दिनाचे माहात्म्य अन् साजरा करण्याची पद्धत या लेखातून जाणून घेऊया.

इतिहास : सोन्याच्या हिरेजडीत रथात सूर्यदेव बसलेला दिवस म्हणजेच 'रथसप्तमी' : सूर्यदेवाला साधना करतांना स्थिर उभे रहायला लागल्याने उभे राहून त्याला त्याची गति सांभाळता येईना. त्याचे पाय दुखू लागले आणि त्यामुळे त्याची साधना नीट होईना. तेव्हा त्याने परमेश्वराजवळ त्याविषयी तक्रार केली अन् बसण्याची व्यवस्था करण्यासाठी सांगितले. 'मी बसल्यानंतर माझी गति कोण सांभाळणार', अशी त्याने परमेश्वराजवळ विचारणा केली. तेव्हा परमेश्वराने सूर्यदेवाला बसण्यासाठी सात अश्व (घोडे) असलेला सोन्याचा हिरेजडीत रथ तयार करून दिला. ज्या दिवशी सूर्यदेव त्या रथात बसला, तो दिवस म्हणजे 'रथसप्तमी'. याचा अर्थ 'सात घोड्यांच्या रथ'.

'रथसप्तमी' हा सूर्यदेवाचा जन्मदिन ! - 'माघ शुक्ल पक्ष सप्तमीला 'रथसप्तमी' असे म्हणतात. महर्षि कश्यप आणि देवमाता अदिती यांच्या पोटी सूर्यदेवाचा जन्म झाला, तो हा दिवस ! भगवान श्रीविष्णूचे एक रूप म्हणजेच श्री सूर्यनारायण होत. संपूर्ण विश्वाला आपल्या महातेजस्वी स्वरूपाने प्रकाशमय करणाऱ्या सूर्यदेवांमुळे पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे. सूर्याचे उत्तरायणात मार्गक्रमण होत असल्याचे सूचक असलेला रथसप्तमीचा सण ! - रथसप्तमी हा सण सूर्य उत्तरायणात मार्गक्रमण करत



असल्याचे सूचक आहे. उत्तरायण म्हणजे उत्तर दिशेकडून मार्गक्रमण करणे. उत्तरायणात सूर्य उत्तर दिशेकडे कललेला असतो. 'श्री सूर्यनारायण आपला रथ उत्तर गोलार्धात वळवत आहेत', अशा स्थितीत रथसप्तमी दर्शवली जाते. रथसप्तमी हा सण शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस आल्याचा आणि दक्षिण भारतात हळूहळू वाढणाऱ्या तापमानाचा दर्शक असतो, तसेच वसंत ऋतू जवळ आल्याचा सूचक असतो.

जीवनाचा मूळ स्रोत असलेला सूर्य! - सूर्य हा जीवनाचा मूळ स्रोत आहे. सूर्यकिरणांतून शरिराला आवश्यक असलेले 'ड' जीवनसत्त्व मिळते. काळाचे मोजमाप सूर्यावरच अवलंबून आहे. सूर्य हा ग्रहांचा राजा असून त्याचे स्थान नवग्रहांमध्ये आहे. तो स्थिर असून अन्य सर्व ग्रह त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालतात. सूर्य स्वयंप्रकाशी असून अन्य ग्रह त्याचा प्रकाश घेतात.

हिंदु धर्मातील सूर्योपासनेचे महत्त्व - सूर्योपासनेला हिंदु धर्मात पुष्कळ महत्त्व आहे. सूर्याला प्रतिदिन पहाटे अर्घ्य दिल्याने अंधःकार नष्ट करून जग प्रकाशमय करण्यासाठीचे बळ सूर्याला प्राप्त होते. (उपासनेमुळे मूर्ती जागृत होते, तसे हे आहे.)

ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रवीचे (म्हणजे सूर्याचे) महत्व - ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रवि (म्हणजे सूर्य) हा आत्माकारक आहे. 'मानवी शरिरातील प्राण, आत्मिक बळ आणि चैतन्यशक्ती यांचा बोध रवीवरून होतो', असा त्याचा अर्थ आहे. व्यक्तीच्या जन्मकुंडलीतील रवि जितका बलवान, तितकी त्या व्यक्तीची जीवनशक्ती आणि रोग प्रतिकारक शक्ती उत्तम असते. राजा, प्रमुख, सत्ता, अधिकार, कठोरता, तत्त्वनिष्ठता, कर्तृत्व, सन्मान, कीर्ती, आरोग्य, वैद्यकशास्त्र इत्यादींचा कारक रवि आहे. सूर्यदेवांच्या रथाला असणारे सप्त अश्व सप्ताहातील सात वार दर्शवतात. रथाला असणारी बारा चाके बारा राशी दर्शवतात.

रथसप्तमीला करावयाचा सूर्यदेवाचा पूजाविधी -रथसप्तमीला व्यक्तीने अरुणोदयकाली स्नान करावे. सूर्यादेवाची १२ नावे घेऊन न्यूनतम १२ सूर्यनमस्कार घालावेत. पाटावर रथात बसलेल्या सूर्यनारायणाची आकृती काढून त्याची पूजा करावी. त्याला तांबडी फुले वाहावीत. सूर्याला प्रार्थना करून आदित्यहृदयस्तोत्रम्, सूर्याष्टकम् आणि सूर्यकवचम्, यांपैकी एखादे स्तोत्र भक्तीभावाने म्हणावे किंवा ऐकावे. रथसप्तमीच्या दिवशी कुठलेही व्यसन करू नये. रथसप्तमीच्या दुसऱ्या दिवसापासून प्रतिदिन सूर्याला प्रार्थना करावी आणि सूर्यनमस्कार घालावेत. त्यामुळे उत्तम आरोग्य प्राप्त होते.'

रथसप्तमी साजरा करण्याची पद्धत सूर्यनारायणाची पूजा : रांगोळीने किंवा चंदनाने पाटावर सात घोड्यांचा सूर्यनारायणाचा रथ, अरुण सारथी आणि रथात सूर्यनारायण काढतात. सूर्यनारायणाची पूजा करतात. अंगणात गोवऱ्या पेटवून त्यांवर एका बोळक्यात दूध उतू जाईपर्यंत तापवतात; म्हणजे अग्नीला समर्पण होईपर्यंत ठेवतात. त्यानंतर उर्वरित दुधाचा सर्वांना प्रसाद देतात.

मकरसंक्रांत ते रथसप्तमी या काळातील कौटुंबिक विधी : 'सुनेचे तीळवण, जावयाचे प्रथम वाण आणि बाळाचे बोरवण करतात. या वेळी सुनेला, जावयाला आणि बाळाला हलव्याचे दागिने करतात.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# मंठा फेस्टिव्हलसाठी सर्वतोपरी सहकार्य करणार - आ. राजेश राठोड

## मंठा येथे नगरसेवक प्रदीपभाऊ बोराडे क्रिकेट चषकाचे थाटात उद्घाटन संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे यांनी क्रिकेट चषकाच्या माध्यमातून तालुक्यातील खेळाडूंना खेळण्याची संधी दिली. आपल्या नेतृत्व कौशल्याने त्यांनी उत्कृष्ट आयोजन केले. मंठा फेस्टिव्हल साठी त्यांनी पुढाकार घ्यावा आपण सर्वतोपरी सहकार्य करणार अशी ग्वाही आ. राजेश राठोड यांनी दिली.

मंठा येथे नगरसेवक प्रदीप भाऊ बोराडे क्रिकेट चषकाचे उद्घाटन आ. राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर क्रिकेट चषकाचे आयोजक तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, युवा नेते सुरेश पवार, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, माजी सरपंच अनंता वैद्य, कयूमभाई कुरेशी, उबेद बागवान, प्रकाश घुले, इंजि. राहुल वानखेडे, श्याम टाके, शरद मोरे, डॉ. स्वप्नील वायाळ, नंदू टकले, संदीप खंडागळे, तुळशीराम गायकवाड, नागेश सराफ यांची उपस्थिती होती.

यावेळी आ. राठोड यांनी नगरसेवक प्रदीप बोराडे यांच्या आयोजनाचे कौतुक केले. वैभवशाली कुटुंबातून ते आलेले असल्यामुळे नेतृत्व गुण त्यांच्यामध्ये दिसून येतात. त्यांच्या पुढाकारातून मंठा फेस्टिव्हल घेण्यात येईल असे सांगितले. जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते असे सांगून खेळामुळे आरोग्य चांगले राहते त्यामुळे खेळ भावनेतून खेळ खेळावेत असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजक तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वाढदिवस असो किंवा क्रिकेट चषक स्पर्धा आयोजन कमिटीचे सर्व सदस्य प्रचंड मेहनत घेतात. सर्व खेळाडूंनी क्रिकेट स्पर्धा यशस्वीपणे पार पाडाव्यात असे सांगितले. यावेळी युवा नेते सुरेश पवार, अनंता वैद्य, अरुण वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, द्वितीय अनंता वैद्य, तृतीय शाम टाके, चतुर्थ इंजि. राहुल वानखेडे, पाचवे निलेश जोजारे, मॅन ऑफ द मॅच रवी काळे, मॅन ऑफ द सिरीज गणेश गणगे, उत्कृष्ट फलंदाज ट्रॉफी राजेश पवार,



उत्कृष्ट गोलंदाज संदीप ढेंगळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक डॉ. स्वप्नील वायाळ, समालोचक सन्मानचिन्ह कृष्णा हेलसकर यांनी जाहीर केले. रफिक भाई यांनी ग्राउंड उपलब्ध करून दिले तर क्रिकेट चषकाचे समालोचक कय्युम कुरेशी, शेख परवेज, विठ्ठल बोराडे हे राहणार आहेत.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन कमिटीचे रवी काळे, संजय बोराडे, इम्रान पठाण, राहुल बोराडे, सचिन चव्हाळ, शेख ईल्लू, अजिंक्य गोरे, जुनेद पठाण, पंकज राठोड, दिनेश अंभोरे, शेख रियाज, रामेश्वर बोराडे, शेख एहसान, राजा चव्हाण, संदीप ढेंगळे, तानाजी मोरे, अविनाश जाधव, विष्णू वरकड, इमरान बागवान, सोहेल पठाण परिश्रम घेत आहेत. तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे क्रिकेट चषक स्पर्धेत दहा संघांनी सहभाग घेतला आहे.

पान १ वरुन

### जालन्यातील थरारक ...

(दोघेही रा. मातोश्री लॉन परिसर, जालना)

ही संपूर्ण कारवाई पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार सदा खोत, नंदकिशोर टेकाळे, शेख मतीन व आशपाक शाह यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

**गोळीबारामागील कारण अजूनही गुलदस्त्यात**

या प्रकरणी पुढील तपास सुरू असून, गोळीबारामागचे नेमके कारण काय, वैयक्तिक वाद, जुन्या भांडणाचा राग, की अन्य काही गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का? याबाबत पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे. आरोपींकडून वापरलेले शस्त्र, वाहन आणि संपर्कातील व्यक्ती यांचाही तपास केला जात आहे.

गोळीबाराच्या घटनेनंतर शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र काही तासांतच आरोपी जेरबंद करण्यात आल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

### हिंद दी चादर ...

प्रदर्शनाचे दालन भाविकांनी तुडुंब भरल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले. आज, २५ जानेवारी २०२६ रोजी या प्रदर्शनाचा समारोप होणार आहे.

**नेत्रसेवेचा दीप प्रज्वलित करणारी 'देवाभाऊ चष्मा सेवा'**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित भव्य धार्मिक व ऐतिहासिक कार्यक्रमात मानवतेचा आणि सेवाभावाचा प्रत्यय देणारी नेत्रसेवा सध्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. बदलापूर जि. ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते साकीब गोरे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'देवाभाऊ चष्मा सेवे'ला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत असून, नेत्रतपासणीसाठी दिवसभर रांगा लागत आहेत.

देवाभाऊ चष्मा या सेवेत मोफत नेत्रतपासणी करण्यात येत असून, गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटपही केले जात आहे. वृद्ध, महिला, कामगार, शेतकरी, विद्यार्थी अशा विविध घटकांतील हजारो नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. अनेकांना पहिल्यांदाच व्यवस्थित नेत्रतपासणीची संधी मिळाल्याने नागरिकांकडून समाधान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली जात आहे. 'सेवा हाच खरा धर्म' या भावनेतून साकीब गोरे यांनी ही नेत्रसेवा सुरू केली आहे. हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या निमित्ताने लाखो भाविक नांदेडमध्ये दाखल होत असताना, त्यांच्या आरोग्याची विशेषतः डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे ओळखून ही सेवा उभारण्यात आली आहे. आर्थिक अडचणींमुळे चष्मा न घेऊ शकणाऱ्या अनेक गरजूंना या माध्यमातून नवा दृष्टीकोन मिळत आहे. गर्दी असूनही सेवा सुरळीतपणे सुरू आहे. महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सहकार्य करण्यात येत आहे. नागरिकांकडून साकीब गोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

श्री. साकीब गोरे म्हणाले, आपण ३४ वर्षापासून ही नेत्रसेवा करत आहे.आजपर्यंत ३७ लाख नागरिकांची नेत्रतपासणी केली आहे.१७ लाख नागरिकांना चष्मे मोफत पुरविण्यात आली आहेत.६३ हजार मोतिबिंदू शस्त्रक्रिया केल्या आहेत.

# आगामी काळात आरक्षित जागेवरसुद्धा व्यवसायाच्या संधी-विद्यानंद बेडेकर

## महाराष्ट्र क्रेडाई उपाध्यक्षांच्या उपस्थितीत बांधकाम व्यावसायिकांसाठी सेमिनार

**जालना । प्रतिनिधी -** आरक्षित जागेवर जसे शाळा, दवाखाना, ग्रंथालय, व्यावसायिक अशा आरक्षित जागेवरती ४० टक्के बांधकाम शासनाच्या नियमानुसार करून दिल्यास ६० टक्के जागा विकसकाला विकसित करण्यासाठी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे आगामी काळात आरक्षित जागेवरसुद्धा बांधकाम व्यावसायिकांना मोठ्या संधी उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र क्रेडाईचे उपाध्यक्ष इंजि. विद्यानंद बेडेकर यांनी येथे केले.




जालना क्रेडाईतर्फे टीडीआर या विषयावर बांधकाम व्यवसायिकासाठी हॉटेल शॅफरॉन येथे आयोजित सेमिनारमध्ये विद्यानंद बेडेकर बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रॅक्टिसिंग आर्किटेक अँड इंजीनियर असोसिएशनचे अध्यक्ष विनोद यादव हे उपस्थित होते. यावेळी श्री. बेडेकर यांनी ट्रान्सफर डेव्हलपमेंट राइट्स अर्थात टिडीआर या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी टीडीआर कसा उपलब्ध केला जातो, तो कसा हस्तांतरित होतो ल, त्याचे फायदे व महत्व काय याविषयी बांधकाम व्यवसायिक व अभियंता मार्गदर्शन केले. जमिनीच्या किमती गगनाला भिडल्यामुळे माझे छत, माझे अंगण ही संकल्पना आता कालबाह्य होत आहे. प्लॉटच्या किमती किमान तीन ते पाच हजार रुपये चौरसफूट के झाल्या असल्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला प्लॉट विकत घेऊन बांधकाम करणे अशक्य बाब झाली आहे. बहुमजली इमारतीमध्ये फ्लॅट हा सर्वसामान्यांसाठी परवडणारा आहे. व्यवसायिकांना प्लॉट घेऊन बांधकाम करताना एफएसआय कमी मिळत असल्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. त्याकरता टीडीआर त्या प्लॉटवर लोड केला तर निश्चितच एफएसआय वाढवून मिळतो. विकासालाकालाही त्यात अपेक्षित उत्पन्न मिळू शकते व फ्लॅट विकत घेणाऱ्यांनाही परवडणाऱ्या किमतीत फ्लॅट मिळू शकतो, असे सांगून आरक्षित जागेवरसुद्धा व्यवसायाच्या मोठ्या संधी कशा उपलब्ध होणार आहे त्याबाबत त्यांनी खुलासेवार माहिती दिली.

प्रास्ताविकपर भाषणात जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार म्हणाले की, शहराची व्याप्ती वाढू लागल्यामुळे ७- ८ किलो मीटरपर्यंत तीन ते पाच हजार रुपये अशा जागेच्या किमती झाल्यामुळे सर्वसामान्यांना आता परवडणाऱ्या किमतीमध्ये फ्लॅट हा एकच मार्ग सध्या उपलब्ध आहे. बहुमजली इमारत उभ्या केल्याशिवाय यापुढील काळात पर्याय नाही.

या कार्यक्रमास क्रेडाईचे माजी अध्यक्ष अभय कुलकर्णी, संजीव मुथा, शेखर जैस्वाल, केदार जाधव, शरद बारगजे, अंशुल आबड, वैभव बंब यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू पाटेकर यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष अविनाश भोसले यांनी केले.

# गोंदी पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

### विना क्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ७.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**जालना । प्रतिनिधी -** पोलीस ठाणे गोंदी हद्दीत अवैध व्यवसाय करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी दिल्यानंतर, गोंदी पोलिसांनी विशेष मोहीम राबवत अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत विना क्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉलीसह एकूण ७ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**गोपनीय माहितीवर आधारित कारवाई**

काल दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी गोंदी पोलीस ठाणे हद्दीत अवैध व्यावसायांविरुद्ध विशेष मोहीम सुरू असताना, प्रभारी अधिकारी गोंदी यांना गोपनीय माहिती मिळाली की, बारसवाडा फाट्याजवळून विना क्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉली अवैधरित्या वाळू वाहतूक करत पाचोडच्या दिशेने जात आहे.

**बारसवाडा फाट्यावर रंगेहाथ पकड**

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ हालचाल करत सुमारे दुपारी ३.३० वाजता सदर ठिकाणी सापळा रचला. त्यावेळी सोनालिका कंपनीचा निळ्या रंगाचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये वाळू भरून नेत असताना रंगेहाथ मिळून आला.

चालकाची ओळख ट्रॅक्टर ताब्यात घेऊन चालकाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव अभिषेक बंडु जाधव (रा. पाचोड, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले.

**७.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केला आहे. सोनालिका कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर ₹५,५०,००० विना क्रमांकाची ट्रॉली ₹१,५०,००० वाळू ₹५,००० एकूण जप्त मुद्देमाल : ₹७,०५,००० ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत आशिष खांडेकर (सहाय्यक पोलीस निरीक्षक) पोलीस अंमलदार फुलचंद हजारे, रामदास केंद्रे, दीपक भोजने, विजय काळे, वहाब शेख यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**अवैध वाळू माफियांना इशारा**

गोंदी पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर ही कारवाई कठोर इशारा मानली जात असून, पुढील काळातही अवैध व्यवसाय करणाऱ्यांविरोधात अशाच प्रकारे प्रभावी व सातत्यपूर्ण कारवाई केली जाईल, असा संदेश पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# रस्ता खुला करून न दिल्यास आत्मदहन करण्याची परवानगी द्यावी - गिरी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील तहसील कार्यालया समोर दि.२३/०१/२०२६, रोजी, रा. बाबुलतारा ता.परतूर .राम पिता सुंदर गिरी.यांचे आमरण उपोषणाचा पहिला दिवस आहे.

अर्जदारांनी मौजे बाबुलतारा ता.परतूर जि.जालना गट नं.२२ मधुन गट नं.२३ मध्ये जाणारा उत्तर -दक्षिण वहिवाटीचा रस्ता गैर अर्जदारांनी आडवल्या कारणांमुळे सदरील रस्ता मोकळा करून मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. सदर अर्जाची मामलेदार अधिनियमान्वये नोंद घेऊन प्रक्ररणात चौकशी करून दि.०९/०५/२०२५, रोजी अर्जदाराचे हक्कात न्याय निर्णय पारित करण्यात आलेला तसेच गट नंबर १५ मध्ये बाबासाहेब गंगाधर मुळे यांच्या मालकीचे शेत असून सदरील गटामधून अर्जदार क्रमांक १ ते ३ यांचे शेत गट नं. २३ मध्ये जाण्यासाठी चा वाही वाटीचा रस्ता असून सदरील रस्ता हा विनाकारण आडवीला असून अर्जदारांना वापरण्यास मजाव करून तो बंद केलेला आहे. त्यामुळे अर्जदारांनी दि.२६/०५/२०२५ रोजी व दि.२८/११/२०३५ रोजी मा. तहसील कार्यालय परतूर येथे दिला आहे. त्यामुळे सदर न्याय निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी. प्रकरणात मामलेदार अधिनियमानुसार न्याय निर्णय पारित झालेला असून सदर न्याय निर्णय पारित होऊन बराच कालावधी लोटलेला असून सदर न्याय निर्णयाविरुद्ध कोणतेही अपील अथवा दावा दाखल नसून प्रलंबित नाही तसेच अर्जदाराने वेळोवेळी लेखी अर्ज देऊनही अद्याप पर्यंत अर्जदारांच्या अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही.

सदरच्या रस्त्या अभावी अर्जदारांची शेतजमीन पडीत पडली असून अर्जदारावर उपासमारीची वेळ आलेली आहे. सदर न्याय निर्णय कायम झालेला असून अर्जदारास न्यायनिर्णयात नमूद रस्ता तात्काळ खुळा करून मिळणे आवश्यक असून जेणेकरून अर्जदारांना त्यांची शेती वहीती करणे शक्य होईल त्यामुळे मा. साहेबांना विनंती करण्यात येते की गैर अर्जदार यांनी केलेला अडथळा दूर करून अर्जदारास तात्काळ रस्ता खुला करून देण्यात यावा नसता अर्जदारांना लोकशाही मार्गाने तहसील कार्यालयासमोर अमर उपोषण करीत आहे तात्काळ याची नोंद घ्यावी तसेच मुदतीमध्ये प्रस्तुतच्या अर्जाची दखल घेऊन सदरचा रस्ता खुला करून न दिल्यास अर्जदारासह आत्मदहन करण्याची परवानगी देण्यात यावी.

या आमरण उपोषणाची दखल घेत व लेखी स्वरूपात रस्ता मोकळा करून दिला जाईल यानंतर राम पिता सुंदर गिरी यांनी आपले उपोषण दि.२४/०१/२०२५ रोजी मा.तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक भागवत यांच्या हस्ते उपोषण मागे घेतले.यावेळी शिवसेना उबाठाचे जिल्हा अध्यक्ष, महेश भैय्या नळगे, आणि त्यांचे सहकारी उपस्थितीत होते.



# महाराणा प्रताप यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना बहुजन समाज पार्टी कडून श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी -** वीर शिरोमणि महाराणा प्रताप यांच्या पुण्यतिथीचे (१९ जानेवारी) निमित्त साधून बहुजन समाज पार्टी () जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. महाराणा प्रताप हे स्वाभिमान, त्याग आणि मातृभूमी रक्षणाचे अमर प्रतीक असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी त्यांच्या जीवनातील बलिदानाला वंदन केले.

जिल्हाध्यक्ष अनिल चित्तेकर, जालना विधानसभा प्रभारी राहुल सत्यनारायणजी करनाडे, सय्यद इस्माईल, दिलीप हिवाळे, सुखदेव हिवाळे, विजय भगत पहलवान, भैय्यासाहेब साळवे आणि सय्यद आयन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अभिवादन कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

जालना विधानसभा प्रभारी राहुल करनाडे यांनी सांगितले, ''महाराणा प्रताप यांनी शक्तिशाली आक्रमकांसमोर कधीही डोके झुकवले नाही. त्यांचा अदम्य साहस आणि स्वाभिमान आजही बहुजन समाजाला प्रेरणा देतो. कांशीराम साहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन आम्ही शोषित-वंचितांच्या उत्थानासाठी लढत राहू.''

कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावरही अभिवादन शेअर केले: ''त्याग आणि बलिदानाची अमर उदाहरण मेवाड-मुकुट मणि महाराणा प्रताप यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र श्रद्धांजली. जय महाराणा प्रताप! जय भीम! जय भारत जयघोष देण्यात आला!'' महाराणा प्रताप यांचे निधन १९ जानेवारी १५९७ रोजी झाले होते. ही तारीख दरवर्षी राष्ट्रीय स्वाभिमान दिवस म्हणून साजरी केली जाते. जालना बहुजन समाज पार्टी च्या या कार्यक्रमातून स्वाभिमान, एकजूट आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिला गेला.




## संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध उपोषण - प्रमोद तोतला

### हिशोब द्या, अन्यथा कायदेशीर पर्याय खुले- संजय बोबडे


प्रमोद तोतला


संजय बोबडे

**जालना । प्रतिनिधी -** जालना केमिस्ट असोसिएशनमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक अपारदर्शकतेचा आणि संघटनात्मक नियमभंगाचा गंभीर प्रकार अखेर चव्हाट्यावर आला असून, अध्यक्ष साईनाथ पवार यांच्या कार्यपद्धतीविरोधात सभासदांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे. २०१३ ते २०२६ या तब्बल १४ वर्षांचा आर्थिक हिशोब आजतागायत सादर करण्यात आलेला नसल्याचा गंभीर आरोप संघटनेतील पदाधिकारी व सभासदांनी केला आहे.

**वार्षिक सभा नाही, हिशोब नाही नियमांना केराची टोपली**

संघटनेच्या नियमानुसार दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा घेऊन आर्थिक हिशोब सादर करणे व सभासदांची मंजुरी घेणे बंधनकारक आहे. मात्र, अध्यक्ष साईनाथ पवार यांनी ना एकही वार्षिक सभा घेतली, ना आर्थिक हिशोब सादर केला, असा आरोप करण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कार्यकारिणीच्या बैठकीतही कधीच हिशोब मांडण्यात आलेला नाही.

**५० ते ६० वेळा मागणी, तरीही मौन**

सभासद व पदाधिकाऱ्यांनी दरवर्षी तसेच वेळोवेळी सुमारे ५० ते ६० लेखी पत्रांद्वारे हिशोबाची मागणी केली. मात्र, या सर्व मागण्यांकडे अध्यक्षांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे, तर पदाधिकाऱ्यांनी लेखी पत्र देऊनही त्यालाही केराची टोपली दाखवण्यात आली, अशी संतप्त प्रतिक्रिया सभासदांनी व्यक्त केली आहे.

**राज्य व झोन पातळीवर तक्रारी, तरीही परिणाम शून्य**

या कथित गैरकारभाराबाबत मराठवाडा झोन तसेच राज्य संघटनेकडेही तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्या पातळीवरून अध्यक्षांना पत्रव्यवहार करण्यात आला, मात्र त्या सूचनांनाही कोणतीही दखल घेण्यात आली नाही, असा आरोप करण्यात येतो.

**उपोषण थांबवले; पण आश्वासन हवेतच**

सुमारे तीन वर्षांपूर्वी संघटनेतील सभासदांनी उपोषणाचा इशारा दिला होता. त्यावेळी राज्य संघटनेचे अध्यक्ष आ. अप्पासाहेब यांनी हस्तक्षेप करत,

''दोन महिन्यांच्या आत हिशोब सादर करण्यात यावा'' असा लेखी आदेश अध्यक्षांना दिला होता आणि सभासदांना उपोषण मागे घेण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, त्या पत्रालाही केराची टोपली दाखवण्यात आल्याचा आरोप आता पुन्हा समोर आला आहे.

**लाक्षणिक उपोषणाचा इशारा**

या सर्व प्रकारामुळे आता संघटनेतील संयम सुटत असून, मंगळवार दि. २७ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत जालना दवाबजार येथे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती प्रमोद तोतला आणि संजय बोबडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

**फक्त हिशोब नाही, संघटनात्मक नियमांचाही भंग**

हिशोबात अनियमितता असल्याचा संशय तर आहेच, मात्र संघटना चालवताना पाळावयाचे मूलभूत नियम, लोकशाही प्रक्रिया व पारदर्शकता यांचाही सातत्याने भंग करण्यात आला, असा गंभीर आरोप आंदोलकांनी केला आहे.

**कायदेशीर कारवाईचा इशारा**

''आता देखील हिशोब सादर केला नाही, तर पुढील टप्प्यात कठोर कायदेशीर कारवाई करण्याशिवाय पर्याय उरणार नाही,'' असा ठाम इशारा आंदोलकांनी दिला आहे.

**संघटनेवरील प्रेमाची हाक**

संघटनेवर प्रेम करणारे, ज्यांना संघटना आपली वाटते, ज्यांना संघटनेची सध्याची दुरावस्था सहन होत नाही, अशा सर्व केमिस्टांनी या लाक्षणिक उपोषणात सहभाग नोंदवावा, अशी भावनिक साद त्यांनी केली आहे.

केमिस्ट असोसिएशनसारखी व्यावसायिक संघटना ही सभासदांच्या विश्वासावर आणि पारदर्शक आर्थिक कारभारावर उभी असते. तब्बल १४ वर्षे हिशोब सादर न होणे, सभा न घेणे आणि वरच्या संघटनांच्या आदेशांकडे दुर्लक्ष होणे हे केवळ निष्काळजीपणाचे लक्षण नसून संघटनात्मक लोकशाहीसाठी गंभीर धोक्याची घंटा मानली जात आहे.



**हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास आज (दि. २४) जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे दर्शन घेतले.**

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते जालना महानगरपालिकेतील नवनिर्वाचित शिवसेना नगरसेवकांचा सत्कार

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई येथील उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथरावजी शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय बंगल्यावर (मलबार हिल्स) येथे जालना महानगरपालिकेतील शिवसेना पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा पार पडला. या प्रसंगी शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले *नगरसेवक* सौ. दर्शना झोल ,अमोल ठाकूर, दीपक राठोड किशोर पांगरकर दिनेश भगत, दुर्गेश काठोटीवाले, विजय जाधव, निखिल पगारे, सगीर पैलवान, योगेश भगत, संजय डुकरे, कमलेश खरे,आदी उपस्थित होते.

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या हस्ते वजियी नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच निवडणुकीत वजियी व पराभूत झालेल्या सर्व शिवसेना उमेदवारांना त्यांनी मनोबल वाढवणारे मार्गदर्शन केले.

**शिवसैनिक हा पदापेक्षा मोठा**

याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी उपस्थित नगरसेवकांना व निवडणुकीत पराभव झालेल्या उमेदवारांना मार्गदर्शन करताना सांगितले की,''शिवसैनिक हा सदैव जनतेचा सेवक असतो. तो पदावर असो वा नसो, पण शिवसैनिक म्हणून जनतेने दिलेली पदवी ही सर्वात मोठी असते. त्यामुळे प्रत्येक शिवसैनिकाने जनतेच्या सेवेत स्वतःला झोकून द्यावे. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे आणि कुटुंबातील सदस्याप्रमाणे नागरिकांची काळजी घ्यावी.'' आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी शिवसैनिकांना संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले.

''शिवसेना ही केवळ राजकीय पक्ष नाही, तर जनतेच्या हितासाठी लढणारी चळवळ आहे. जालना जिल्ह्यातील शिवसैनिकांनी संघटनात्मक ताकद वाढवून आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा विजय सुनिश्चित करावा,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच आमदार अर्जुनराव खोतकर यांचे कौतुक करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले,



''जालना जिल्ह्यात शिवसेनेला एक सक्षम, निर्भीड आणि जनतेशी जोडलेला नेता लाभला आहे. आमदार अर्जुन खोतकर हे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे सच्चे शिवसैनिक आहेत. पराभवातून विजय खेचून आणण्याची ताकद त्यांच्या नेतृत्वात आहे. म्हणूनच त्यांना 'मराठवाड्याची बुलंद तोफ' असे संबोधले जाते.''

**जालना शिवसेनेच्या ताकदीचा गौरव**

कार्यक्रमात बोलताना शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आणि शिवसैनिकांना मार्गदर्शन केले.

''जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसैनिकांनी दाखवलेली एकजूट आणि संघर्षशीलता ही शिवसेनेच्या भविष्यासाठी आशादायी आहे. वजियी नगरसेवकांनी जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरावे आणि पराभूत उमेदवारांनी निराश न होता अधिक जोमाने काम करावे,'' असे त्यांनी सांगितले. आमदार खोतकर पुढे म्हणाले, ''शिवसेना ही सत्तेसाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना अधिक मजबूत होत आहे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक शिवसैनिकाने गावोगावी, वॉर्डावॉर्डात जनतेशी थेट संपर्क ठेवून विकासाचे काम पुढे न्यावे. आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना निर्णायक विजय मिळवेल, यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे,'' असे आवाहन त्यांनी केले.

मान्यवरांची उपस्थिती

या सत्कार सोहळ्यास नवनिर्वाचित सर्व शिवसेना पक्षाचे अधिकृत वजियी नगरसेवक तसेच शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सत्कार सोहळा जालना शिवसेनेच्या संघटनात्मक बळाचे दर्शन घडवणारा ठरला असून आगामी राजकीय वाटचालीसाठी शिवसैनिकांना नवचैतन्य देणारा ठरल्याचे चित्र दिसून आले.

## जिजामाता कॉलनीत भाजपा नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** जिजामाता कॉलनी, जालना येथे जालना शहर महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग क्रमांक १ मधील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या सत्कार सोहळ्यात नवनिर्वाचित नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशीला भास्करराव दानवे, सौ. पदमा अजित मानधानी, सौ. ज्योती रवी सले व श्री. कल्याण भदनेकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास श्री. जीवन सले, सरचिटणीस श्री. सुनील पवार, तालुकाध्यक्ष श्री. संजय डोंगरे, श्री. रोशन चौधरी, श्री. तुलजेश चौधरी, श्री. रोहित नलावडे यांच्यासह जिजामाता कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मा. नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे यांनी प्रभाग क्रमांक १ हा राज्यात आदर्श (मॉडेल) प्रभाग म्हणून विकसित करण्यात येईल, तसेच जिजामाता कॉलनीतील उर्वरित विकासकामे प्राधान्याने



पूर्ण केली जातील, अशी ग्वाही दिली. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला न्याय देत लोकाभिमुख व पारदर्शक कारभार करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी सर्व नागरिकांचे मनापासून आभार मानण्यात आले.

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक

## निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आढावा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूका ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर जिल्हानिहाय तयारीचा आढावा आज राज्य निवडणूक आयूक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला.

विभागात करण्यात आलेल्या निवडणुकांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करून मतदान प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पडेल आणि मतदानाच्या टक्केवारीत आणखी वाढ होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी आणखी मोठ्याप्रमाणात जनजागृती करण्याच्या सुचनाही सर्व प्रशासकीय यंत्रणांना दिल्या.

येथील विभागीय आयुक्त कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव सुर्या कृष्णमुर्ती, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ.विनय राठोड, परभणीचे पोलीस अधीक्षक विरेंद्रसिंह परदेशी, धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खोकर प्रत्यक्ष उपस्थित होते. तर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप, लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे व सागर पाटील सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

मतदानाविषयी जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार जनजागृती(स्वीप) उपक्रमांचे श्री. वाघमारे यांनी कौतुक करत इतर जिल्ह्यांनीही मतदार जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याचेही निर्देश दिले. तसेच मतदान करण्याच्या प्रकियेविषयी मतदारांमध्ये विविध प्रसिद्धी माध्यमांतून जनजागृती करावी, वृध्द(वय ८० वर्षावरील), गरोदर महिला, दिव्यांग व्यक्ती यांना मतदान करणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात याव्यात. मतदार याद्यांतील दुबार मतदारसंख्या कमी करण्याच्या दृष्टीने दुबार नाव नोंदणी असलेल्या मतदारांकडून संमतीपत्रे भरून घेण्याचे काम गांभीर्याने करावे. त्याचबरोबर आचारसंहिता काळात प्रशासनाने केलेल्या कारवाईसही विविध माध्यमांव्दारे प्रसिद्धी देण्याच्या सूचना श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

राज्य निवडणूक आयोग २०१० पासून मतदानावेळी मार्कर पेनची शाई वापरत आहे. परंतू यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी लोकसभा, विधानसभा निवडणूकीप्रमाणे म्हैसूर शाईचा वापर करण्यात येणार असल्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरक्षितरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदारांच्या प्रमाणात पुरेसे मतदान केंद्रे, इव्हिएम मशीनची उपलब्धता, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांची व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचारी यांचे आवश्यक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही, स्ट्राँगरूमची व्यवस्था व सुरक्षा करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहे, याबाबत संगणकिय सादरीकरण केले.

मतदार यांद्यांतील दुबार नावांच्याबाबत कारवाई करण्यात येऊन दुबार मतदारांकडून दुबार मतदान करणार नसल्याचे संमंतीपत्रे भरुन घेण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याचबरोबर आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये म्हणून सर्व राजकिय पक्षांशी संवादावर भर दिला जात आहे. तर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांसोबत वेळोवेळी बैठका व संवाद करण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच सर्व पोलीस अधीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडिओ सर्वेक्षक पथके, वॉरंट बजावणी, अवैध्य मद्य विक्री वर कारवाई व कायदासुव्यस्थेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगून मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी बंदोबस्तकामी मनुष्यबळाची उपलब्धता व आवश्यकता आदीबाबत माहितीचे संगणकिय सादरीकरण केले.

पोलीस महानिरिक्षक वीरेंद्र मिश्र, नांदेड विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप यांनीही जिल्ह्यांत निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यस्था राखण्यात येत असल्याचे सांगत संवेदनशिल मतदान केंद्रे असलेल्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यांच्या सीमा भागात नाका बंदी करण्यात येत असून करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईसंदर्भात माहिती दिली. तसेच निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

## श्रम संस्कार शिबिरातुन विद्यार्थी घडतात - श्रीराज भरणे

**इंदापूर । प्रतिनिधी -** कुरवली ता. इंदापूर येथे इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासासाठी युवक पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन उपक्रमांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न झाले.शिबीर समारोप प्रसंगी युवा नेते श्रीराज भरणे यांनी श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थी घडत असल्याचे सांगितले.यावेळी इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव वीरसिंह रणसिंग,छत्रपती सहकारी साखर कारखाना संचालक पृथ्वीराज घोलप, जिल्हा नियोजन समिती माजी सदस्य सचिन सपकळ,महाविद्यालय प्राचार्य डॉ.अशोक काळंगे,सरपंच राहुल चव्हाण,उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर गुळीग,मुख्याध्यापिका लक्ष्मी गायकवाड ,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेंद्रकुमार डांगे,प्रा. सुवर्णा बनसोडे,प्रा.अमर वाघमोडे,प्रा रवी गायकवाड,प्रा.महादेव माळवे,प्रा.नितीन रुपनवर,प्रा.सोमनाथ चव्हाण,प्रा.आकांक्षा मेटकरी,ग्रामपंचायत सदस्य विजयकुमार पांढरे,सदस्य शिवाजी चव्हाण,सोसायटी सदस्य महेश पांढरे,अंगणवाडी सेविका कीर्ती कदमइत्यादी मान्यवर उपस्थित होते.सात दिवशीय शिबिरामध्ये स्वच्छता अभियान,महिला सबलीकरण व सक्षमीकरण,मतदार साक्षरता अभियान,समर्थ भारत सक्षम युवा अभियान, माझा गाव डिजिटल लिटरसी सर्वेक्षण, वृक्षारोपण,महात्मा गांधी विचार शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास,रस्ते सुरक्षा जनजागृती,आरोग्य विषयक जनजागृती, गावातील मंदिरे संवर्धन व स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रम घेण्यात आले शिबिर समारोप प्रसंगी युवा नेते श्रीराज भरणे यांनी विद्यार्थी संस्कारक्षम घडवण्याचं काम श्रमसंस्कार शिबिरात होत असल्याचे सांगितले.सामाजिक जाणीव तसेच वैचारिक प्रबोधन इत्यादीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या शिबिरात प्रबोधन होत असल्याने जीवनात श्रम संस्कार शिकवण्याचे काम शिबिराच्या माध्यामातून होत असल्याचे भरणे यांनी सांगितले.संस्था सचिव विरसिंह रणसिंग यांनी मागील तीन वर्षापासून कुरवली गावात विशेष श्रमसंस्कार शिबिर यशस्वीरित्या घेण्यात आल्याने गावात सार्वजनिक स्वच्छता,आरोग्य विषयक जनजागृती व सामाजिक कार्य विद्यार्थ्यांच्या हातून घडल्याचे सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.